08 August 2026 page 01_Layout 1 09-08-2026 08:29 PM Page 1



कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

**दि. १० ऑगस्ट २०२६**



१९३०- अखिल भारतीय दलित काँग्रेस महिलांचे स्वतंत्र अधिवेशन.
१९४९- घटनेच्या ५ व्या कलमांत डॉ बाबासाहेबांनी अनेक सुधारणा सुचविल्या.
१९५१- पंडित जवाहरलाल नेहरू यांना हिंदू कोड बिल संबंधी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पत्र.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

सोमवार १० ऑगस्ट २०२६ | वर्ष : ६ | अंक : २२१ | दैनिक | किंमत : ₹५/-
Monday, 10 August 2026 | Year : 6 | Issue : 221 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्वाच्या बातम्या

### ममता बॅनर्जींच्या ताफ्यावर हल्ला

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमध्ये गेल्या काही दिवसांपासून मोठ्या घडामोडी सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी टीएमसीचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या ताफ्यावर हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे पश्चिम बंगालमध्ये पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे.



पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या उत्तर २४ परगणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होत्या. यावेळी तृणमूल काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याच्या घरी भेट घेण्यासाठी ममता बॅनर्जी दाखल झाल्या होत्या. मात्र, यावेळी काही जणांनी ममता बॅनर्जी यांच्या ताफ्याचा मार्ग अडवण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या ताफ्यावर दगडफेक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यावेळी ममता बॅनर्जी यांच्या वाहनांवर दगड आणि चिखल व चपला फेकण्यात आल्याचा आरोप टीएमसीकडून करण्यात आला आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या घटनेवेळी नागरिकांनी 'चोर, चोर' अशी जोरदार घोषणाबाजी केल्याची माहिती सांगितली जात आहे.

"पोलिसांच्या समोरच काही समाजकंटकांनी माझ्या कारवर मोठे दगड फेकले. हा हल्ला एवढा तीव्र होता की, जर गाडीच्या खिडक्या उघड्या असत्या तर माझं डोकं फुटलं असतं. आम्ही सर्वजण गंभीर जखमी झालो असतो. हे सर्व पोलिसांच्या समोर घडलं आहे. अशा प्रकारच्या घटना याआधी मी कधीही पाहिल्या नाहीत. सध्या पश्चिम बंगालमध्ये हे काय चाललंय? पोलीस फक्त भाजपाला संरक्षण देत आहेत", असा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला.

### चार उच्च न्यायालयांना मिळणार नवीन सरन्यायाधीश

**नवी दिल्ली :** भारताचे सरन्यायाधीश (CJI) सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने पाटणा, कलकत्ता, मुंबई आणि पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीश पदांसाठी चार न्यायाधीशांच्या नियुक्तीची शिफारस केली आहे.



सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने ६ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या आपल्या बैठकीत, खाली नमूद केलेल्या न्यायाधीशांना उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश म्हणून पदोन्नती देण्याची शिफारस केली आहे, असे सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. शिफारशीनुसार, दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व्ही. कामेश्वर राव यांची पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शिफारस करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे यांची कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शिफारस करण्यात आली आहे. कॉलेजियमने अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शिफारस केली आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात कार्यरत असलेले न्यायमूर्ती अश्वनी कुमार मिश्रा यांचीही त्याच उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शिफारस करण्यात आली आहे. त्यांचे मूळ उच्च न्यायालय अलाहाबाद उच्च न्यायालय आहे. एका स्वतंत्र निवेदनात, सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने दोन उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या बदल्यांची शिफारस केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने ६ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या आपल्या बैठकीत, खालील उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या बदल्यांची शिफारस केली आहे, असे निवेदनात म्हटले आहे. या शिफारशीनुसार, गुवाहाटी उच्च न्यायालयाचे स्थायी न्यायाधीश, न्यायमूर्ती मनाश रंजन पाठक, यांची ओरिसा उच्च न्यायालयातून गुजरात उच्च न्यायालयात बदली करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

# महिला आरक्षण मुद्द्यावर केंद्र-काँग्रेस आमने-सामने!

**नवी दिल्ली :** महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीवरून केंद्र सरकार आणि काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा जोरदार राजकीय संघर्ष पेटला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांच्यात शनिवारी 'एक्स' या समाज माध्यमावरून थेट शाब्दिक युद्ध रंगले.

२०२३ मध्ये संसदेत एकमताने मंजूर झालेला महिला आरक्षण कायदा तीन वर्षांनंतरही लागू का झालेला नाही आणि त्याची अंमलबजावणी मतदारसंघ पुनर्रचनेशी का जोडली जात आहे, असा थेट सवाल राहुल गांधी यांनी केला. त्यावर रिजिजू यांनी घटनात्मक तरतुदींचा हवाला देत, जनगणनेनंतरची मतदारसंघ पुनर्रचना लवकर केली नाही तर महिला आरक्षणाची अंमलबजावणी २०३४च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी होणे कठीण असल्याचे सांगितले. मात्र, पुनर्रचना तातडीने केली तर २०२९च्या निवडणुकीतच महिला आरक्षण लागू होऊ शकते, असा दावा त्यांनी केला.



या दाव्या-प्रतिदाव्यांमुळे महिला आरक्षणासोबतच मतदारसंघ पुनर्रचनेचा मुद्दाही राजकीय संघर्षाच्या केंद्रस्थानी आला आहे. महिलांना ३३ टक्के आरक्षण कधी मिळणार, याचे उत्तर आता केंद्र सरकार आणि विरोधक यांच्यामधील या राजकीय संघर्षातूनच ठरणार आहे.

राहुल गांधी यांनी महिलांना मोकळेपणाने व्यक्त होण्याची संधी मिळणे आवश्यक असल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर रिजिजू यांनी काँग्रेसच्या भूमिकेत 'हृदयपरिवर्तन' झाल्याचा टोला लगावला. काँग्रेसने महिला आरक्षण विधेयकाला बिनशर्त पाठिंबा द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली.रिजिजूंच्या या भूमिकेला राहुल यांनी लगेच प्रत्युत्तर दिले. रिजिजूंना २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक संसदेत एकमताने मंजूर झाल्याचे चांगलेच ठाऊक आहे, असे सांगत गांधी यांनी काँग्रेसने या विधेयकाला पूर्ण पाठिंबा दिल्याचे स्पष्ट केले.

"तीन वर्षांनंतरही त्याची अंमलबजावणी का झालेली नाही? ती मतदारसंघ पुनर्रचनेशी अनावश्यकपणे का जोडली जात आहे?" असा सवाल करत गांधी यांनी २०२३चा कायदा कोणत्याही अटींशिवाय लागू करा, असे आवाहन सरकारला केले. राहुल गांधींच्या सवालाला रिजिजू यांनी घटनात्मक तरतुदींचा दाखला देत उत्तर दिले. महिला आरक्षण तरतूद १०६व्या घटनादुरुस्ती कायद्यात करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी २०२३नंतर प्रसिद्ध होणाऱ्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे होणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतरच होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. २०२६नंतरच्या जनगणनेची आकडेवारी प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, जातनिहाय जनगणनेमुळे त्याला कालावधी लागू शकतो. मतदारसंघ पुनर्रचना उशिरा झाल्यास २०३४ पर्यंत महिला आरक्षण अंमलबजावणी लांबू शकते, असे रिजिजू म्हणाले.

मात्र, २०२९च्या लोकसभा निवडणुकीतच महिला आरक्षण लागू करायचे असेल तर उपलब्ध ताज्या जनगणना आकडेवारीच्या आधारे मतदारसंघ पुनर्रचना तातडीने करावी लागेल, अशी स्पष्ट भूमिका रिजिजू यांनी राहुल गांधी यांचा दावा खोडताना मांडली.

महिला आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठीची पद्धत २०२६च्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकात प्रस्तावित करण्यात आल्याचे रिजिजू यांनी सांगितले. त्यासाठी आणलेले घटनादुरुस्ती विधेयक मात्र लोकसभेत फेटाळले गेले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यामुळे आता महिला आरक्षणाची अंमलबजावणी आणि मतदारसंघ पुनर्रचना या दोन्ही मुद्द्यांवर सरकार आणि विरोधकांमध्ये संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.या 'एक्स'वरील संघर्षाच्या काही दिवस आधीच रिजिजू आणि राहुल गांधी यांच्यात दूरध्वनीवर चर्चा झाली होती.

### हा विद्यार्थ्यांचा नव्हे, व्यवस्थेचा पराभव : राहुल गांधी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी प्रयागराजमध्ये एका विद्यार्थ्यासोबत झालेल्या भेटीचा हवाला देत, केंद्र सरकार विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, त्या विद्यार्थ्याने त्यांना सांगितले की त्याच्याकडे दुसरा कोणताही पर्याय उरला नव्हता. राहुल यांनी स्पष्ट केले की, त्या विद्यार्थ्याने अनेक वर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी केली होती, त्यासाठी त्याने आपल्या कुटुंबाची जमीनही विकली होती आणि त्याच्या पालकांवर कर्जही झाले होते, तरीही त्याला यश मिळवता आले नाही. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये राहुल गांधी म्हणाले की, हा विद्यार्थ्याचा पराभव नाही, तर व्यवस्थेचा पराभव आहे, जी त्याच्या मेहनतीचे योग्य फळ देण्यात अपयशी ठरली आहे. त्यांनी परीक्षा पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याबाबत सरकारकडून उत्तरदायित्वाची मागणी केली. अमित शाह यांच्यावरही निशाणा साधला. १३ दिवस उलटूनही विद्यार्थी आंदोलनाबाबत त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद आलेला नाही, असे ते म्हणाले. दिल्लीतील आंदोलक विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज आणि पेलेट्सचा वापर केल्याचा आरोप करत, सरकारला याचे उत्तर द्यावे लागेल, असे ते म्हणाले.

काल, काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी प्रयागराजमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधला होता. 'छात्रो की गुंज' कार्यक्रमात त्यांनी तरुणांना आवाहन केले की, व्यवस्था द्वेषाने नव्हे तर प्रेम आणि आपुलकीने बदलायची आहे. एलईडी स्क्रीनवरील पंतप्रधान नरेंद्र मोदी, उद्योजक गौतम अदानी आणि संघ प्रमुख मोहन भागवत यांच्या चित्रांकडे निर्देश करत, त्यांनी केपी कॉलेजच्या इंटर कॉलेज मैदानावर उपस्थित हजारो विद्यार्थ्यांना सांगितले की, संपूर्ण व्यवस्था त्यांच्या हातात आहे आणि या व्यवस्थेने रोजगार नष्ट केला आहे.

## केरळमध्ये वंदे मातरम पूर्ण गायले जाणार नाही: मंत्री मुरलीधरन यांची घोषणा

**कोची :** केरळमध्ये 'वंदे मातरम'च्या संपूर्ण गायनावरून निर्माण झालेला वाद अधिकच गडद झाला आहे. आरोग्य मंत्री के. मुरलीधरन यांनी म्हटले आहे की, पूर्वीप्रमाणेच राज्य सरकारच्या कार्यक्रमांमध्ये फक्त पहिल्या दोन ओळीच गायल्या जातील. काँग्रेसचे खासदार राजमोहन उन्नीथन यांनीही संपूर्ण गायनाला विरोध केला आहे. 'वंदे मातरम'चे सामूहिक गायन हे केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार असल्याचे मुख्य सचिवांनी पत्राद्वारे कळवल्यानंतर हा वाद निर्माण झाला आहे. सीपीआय(एम)नेही हा निर्देश मागे घेण्याची मागणी केली असून, राज्य सरकार आरएसएसच्या अजेंड्यापुढे झुकल्याचा आरोप केला आहे.

पत्रकारांशी बोलताना मुरलीधरन म्हणाले की, पूर्वी सर्व राज्य सरकारी कार्यक्रमांमध्ये वंदे मातरमच्या फक्त पहिल्या दोन ओळी गायल्या जात असत आणि ही प्रथा पुढेही चालू राहील. दरम्यान, काँग्रेस खासदार राजमोहन उन्नीथन म्हणाले की, केरळमध्ये या जन्मात संपूर्ण वंदे मातरम गायले जाणार नाही. एका टीव्ही चॅनलशी बोलताना ते म्हणाले की, वंदे मातरम पूर्ण गाण्याबाबत मुख्य सचिवांकडून आलेल्या कोणत्याही निर्देशाबद्दल त्यांना माहिती नाही. तथापि, त्यांनी स्पष्ट केले की संपूर्ण गाणे गायले जाणार नाही. ते असेही म्हणाले की, नरेंद्र मोदींनी आम्हाला गोळ्या घालण्याची



धमकी दिली तरीही, वंदे मातरमचे संपूर्ण गायन स्वीकारले जाणार नाही.

केरळचे मुख्य सचिव विश्वनाथ सिन्हा यांनी ६ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या पत्रानंतर मुरलीधरन आणि उन्नीथन यांनी ही टिप्पणी केली आहे. या पत्रानुसार, 'आझादी का अमृत महोत्सवा'चा भाग म्हणून २०२२ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेची २०२६ मधील आवृत्ती, राष्ट्रगीत 'वंदे मातरम'च्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त देशभरात होणाऱ्या उत्सवाच्या तिसऱ्या टप्प्याशी संलग्न करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय अंमलबजावणी समितीने या उपक्रमाला मंजुरी दिली होती.

निर्देशानुसार, या काळात होणाऱ्या सर्व थेट कार्यक्रमांमध्ये सामूहिक वंदे मातरम गायन आणि राष्ट्रध्वज फडकवणे यांचा समावेश असेल. याव्यतिरिक्त, 'हर घर तिरंगा' पोर्टलद्वारे डिजिटल सहभाग घेतला जाईल, जिथे नागरिक तिरंग्यासोबतचे त्यांचे सेल्फी अपलोड करू शकतील.

## नाशिकमध्ये जाणवले सौम्य भूकंपाचे धक्के

**नाशिक :** महाराष्ट्रातील नाशिकमध्ये शनिवारी आणि रविवारी सौम्य भूकंपाचे धक्के जाणवल्याने जिल्ह्यातील काही भागांतील घरांच्या भिंतींना तडे गेले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या (NCS) माहितीनुसार, शनिवारी रात्री १० वाजता नाशिकमध्ये ४.३ तीव्रतेचा भूकंप झाला. त्यानंतर रविवारी पहाटे ५:३३ वाजता ३.३ तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जाणवला.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्र-गुजरात सीमेजवळील हातगढ पर्वतरांगेजवळील भानवड परिसरात जमिनीखाली ५ किलोमीटर खोलीवर भूकंपाच्या हालचालींची नोंद झाली.

जिल्ह्यातील नाशिक शहर, सुरगाणा, कळवण, देवळा, चांदवड, पेठ, दिंडोरी आणि निफाड तालुक्याच्या काही भागांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली आणि अनेक जण घराबाहेर धावले.

जिल्हा अधिकाऱ्यांनी सुरगाना तालुक्यातील भादर गाव आणि दिंडोरी तालुक्यातील नानाशी गावातील काही घरांच्या भिंतींना तडे गेल्याची माहिती दिली. कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. परिसरातील धरणांचीही पाहणी करण्यात आली, परंतु कोणतेही नुकसान आढळले नाही. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले, लोकांनी घाबरू नये. त्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. मात्र, सर्वांनी सतर्क राहावे आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात. यापूर्वी जिल्ह्यात २५ ते २८ जुलै आणि ६ ऑगस्ट रोजी भूकंपाची नोंद झाली होती.




## इस्त्रायलने फेटाळली डोनाल्ड ट्रम्प यांची १५ कलमी गाझा शांतता योजना

### सैन्य माघारीस नेतन्याहूंचा स्पष्ट नकार



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'बोर्ड ऑफ पीस'ने घोषित केलेली गाझासाठीची १५ कलमी योजना इस्त्रायलने फेटाळली आहे. हमासचे पूर्णपणे निःशस्त्रीकरण होईपर्यंत इस्त्रायल आपले सैन्य मागे घेणार नाही, असं पंतप्रधान बिन्यामिन नेतन्याहू यांनी रविवारी सांगितलं. गेल्या महिन्यात हमासने मंजुरी दिलेल्या योजनेचा उल्लेख करत नेतन्याहू मंत्रिमंडळाच्या बैठकीत म्हणाले, "इस्त्रायल १५ कलमी दस्तऐवज फेटाळत आहे."

हमासचे खऱ्या अर्थाने निःशस्त्रीकरण होत नाही तोपर्यंत इस्त्रायली सैन्य माघार घेणार नाही आणि आमच्या सैन्याविरुद्ध व नागरिकांविरुद्धचे धोके हाणून पाडणं सुरूच ठेवेल, असंही त्यांनी स्पष्ट केले. नेतन्याहू यांचं हे वक्तव्य गाझा युद्ध संपवण्याच्या ट्रम्प यांच्या प्रयत्नांना मोठा धक्का मानला जात आहे. इस्त्रायली सैन्य मागे हटण्यापूर्वी हमासने आपली शस्त्रे सोडली पाहिजेत, असा आग्रह इस्त्रायलने धरला आहे. ट्रम्प यांनी गेल्या महिन्यात या संघर्ष निवारण योजनेत मोठं यश मिळवल्याचा दावा केला होता आणि इस्त्रायल व हमास दोन्ही या आराखड्यावर सहमत असल्याचं म्हटलं होतं.

गेल्या वर्षी सुरू झालेल्या युद्धबंदीनंतर ट्रम्प यांनी असाही दावा केला होता की, ७ ऑक्टोबर २०२३ च्या हल्ल्यापूर्वी जवळपास दोन दशके गाझावर नियंत्रण ठेवणारी हमास संघटना शस्त्रे टाकण्यास तयार झाली आहे. परंतु, गेल्या ऑक्टोबरमध्ये झालेल्या युद्धबंदीच्या करारावर स्वाक्षरी होऊनही इस्त्रायलने गाझामध्ये आपले हल्ले सुरूच ठेवले आहेत. नेतन्याहू यांच्या या नवीन भूमिकेमुळे हमासच्या निःशस्त्रीकरणाचा मुद्दा ट्रम्प यांच्या गाझा योजनेच्या पुढील टप्प्याच्या केंद्रस्थानी आला आहे. पॅलेस्टिनी लढाऊ संघटनेकडे शस्त्रे असेपर्यंत सैन्य माघारीस इस्त्रायल कधीही तयार होणार नाही, हे यातून स्पष्ट झाले आहे.

इस्त्रायलचे सर्वात जास्त काळ पंतप्रधान राहिलेले नेतन्याहू सध्या सत्तेत टिकून राहण्यासाठी कठीण निवडणुकीच्या शर्यतीत आहेत. त्यांच्या कट्टर उजव्या विचारसरणीच्या मित्रपक्षांनी नवीन मंत्रिमंडळ मतदान घेऊन ही गाझा योजना पूर्णपणे बंद करण्याची मागणी केली आहे. यावर नेतन्याहू म्हणाले की, इस्त्रायल आपल्या आक्षेपांबाबत अमेरिकेशी चर्चा करत आहे. "त्यांच्याकडे काही कल्पना आहेत; त्यातील काही आम्हाला मान्य आहेत आणि काही नाही. अशा बाबींवर आमची भूमिका कशी ठाम ठेवायची हे आम्हाला चांगलंच ठाऊक आहे", असं ते म्हणाले.






10 August 2026 page 02_Layout 1 09-08-2026 04:51 PM Page 1



"अनुभव हा जगातील सर्वात चांगला शिक्षक आहे..."

## संपादकीय

### शेतकरी जगला पाहिजे, ही पूर्णपणे व्यवस्थेची जबाबदारी!

महाराष्ट्राच्या विकासाच्या गप्पा आपण रोज ऐकतो. मोठे उद्योग, महामार्ग, मेट्रो, गुंतवणूक, शहरी विकास आणि कोट्यवधी रुपयांच्या योजनांची चर्चा होते. मात्र या विकासाच्या झगमगाटापासून दूर असलेल्या गावाकडे पाहिले की एक वेगळेच महाराष्ट्राचे चित्र दिसते. कर्जाचा डोंगर, वाढता शेतीखर्च, अनिश्चित हवामान, शेतमालाला मिळणारा अपुरा भाव आणि त्यातून निर्माण होणारी आर्थिक विवंचना यामुळे शेतकरी आजही असुरक्षित आहे. सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे काही शेतकरी या संकटातून मार्ग न दिसल्याने आत्महत्येचा टोकाचा निर्णय घेत आहेत. हा प्रश्न केवळ कृषी विभागाचा नाही. हा राजकीय नेतृत्व, प्रशासन, नोकरशाही, नोकरदार वर्ग, बाजारव्यवस्था आणि समाजाच्या सामूहिक जबाबदारीचा प्रश्न आहे. शेतकरी आपल्या शेतात राबतो म्हणून शहरातील नागरिकांच्या ताटात अन्न येते. तो उन्हात, पावसात, थंडीत कष्ट करतो; पण त्याच्या उत्पादनाची किंमत ठरविण्याची ताकद त्याच्याकडे नसते. उत्पादन खर्च वाढतो, बाजारभाव घसरतो, नैसर्गिक आपत्ती येते आणि कर्जाचा हप्ता डोक्यावर उभा राहतो. मग प्रश्न निर्माण होतो.अन्न निर्माण करणारा माणूसच असुरक्षित का? राजकारण्यांनी आश्वासनांपेक्षा जबाबदारी स्वीकारावी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सर्वच राजकीय पक्ष बोलतात. निवडणुकीच्या काळात कर्जमाफी, हमीभाव, सिंचन, पीकविमा, वीज, अनुदान अशा अनेक घोषणा होतात. परंतु निवडणूक संपल्यानंतर त्या घोषणांचे काय होते, याचा हिशेब जनतेने मागितला पाहिजे. लोकप्रतिनिधींनी केवळ विधानसभेत शेतकऱ्यांचा आवाज उठवून थांबता कामा नये. आपल्या मतदारसंघातील प्रत्येक मोठ्या कृषी समस्येचा नियमित आढावा घेणे, शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी प्रशासनावर दबाव आणणे आणि मंजूर योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळतो आहे की नाही हे तपासणे, ही त्यांची जबाबदारी आहे. शेतकऱ्यांच्या नावावर योजना जाहीर करून राजकीय श्रेय घेण्यापेक्षा त्या योजनांचा लाभ शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती दाखविणे आवश्यक आहे. अधिकारी वर्गाने फाईल नव्हे, शेतकरी पाहिला पाहिजे सरकारी कार्यालयात शेतकऱ्याची फाईल किती दिवस पडून आहे, यापेक्षा त्या फाईलमागे उभा असलेला माणूस किती संकटात आहे, हे अधिकाऱ्यांनी समजून घेतले पाहिजे. पीकविमा, नुकसानभरपाई, सातबारा, कर्ज, सिंचन, वीज, अनुदान, पीकनुकसान पंचनामे अशा बाबतीत शेतकऱ्याला वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत. प्रशासनाने शेतकऱ्याच्या दारापर्यंत पोहोचले पाहिजे. तालुका आणि जिल्हा पातळीवर शेतकरी संकट निवारण यंत्रणा अधिक सक्षम झाली पाहिजे. एखाद्या गावात मोठ्या प्रमाणावर पीकनुकसान झाले असेल किंवा शेतकरी कर्जबाजारी झाला असेल तर प्रशासनाने परिस्थिती गंभीर होण्याची वाट पाहू नये. तातडीने विशेष पथक पाठवून आर्थिक, कृषी आणि सामाजिक मदत उपलब्ध करून दिली पाहिजे. नोकरदार वर्गानेही आपली सामाजिक भूमिका ओळखावी सरकारी नोकरदाराला दरमहा पगार मिळतो. त्याला आर्थिक स्थैर्य असते. त्याच्या कुटुंबाला नियमित उत्पन्नाची हमी असते. परंतु शेतकऱ्याचे उत्पन्न वर्षातून एक-दोन वेळा येते आणि तेही निसर्ग व बाजारभावावर अवलंबून असते. म्हणून सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांनी शेतकऱ्याला केवळ 'लाभार्थी' म्हणून पाहू नये. तो या देशाच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे, याची जाणीव प्रशासनातील प्रत्येक व्यक्तीने ठेवली पाहिजे. कार्यालयात आलेल्या शेतकऱ्याशी आदराने बोलणे, त्याचे काम अनावश्यकपणे प्रलंबित न ठेवणे, योग्य माहिती देणे आणि नियमांच्या चौकटीत शक्य ती मदत करणे, ही छोटी वाटणारी गोष्ट शेतकऱ्यासाठी फार मोठी असते. सरकारी योजनांचा हिशेब जनतेसमोर आला पाहिजे शेतकऱ्यांसाठी हजारो कोटी रुपयांच्या योजना असतात. पण त्यातील किती पैसा प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत पोहोचला? किती अर्ज मंजूर झाले? किती प्रलंबित आहेत? किती नुकसानभरपाई मिळाली? पीकविमा कंपन्यांनी किती दावे निकाली काढले? अशा प्रश्नांची सार्वजनिक आणि पारदर्शक माहिती उपलब्ध झाली पाहिजे. मध्यस्थ, दलाल आणि भ्रष्टाचाराला आळा बसला पाहिजे. शेतकऱ्याच्या हक्काचा पैसा त्याच्यापर्यंत पोहोचविणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे. **शेतकऱ्याला मदत नव्हे, सक्षम व्यवस्था हवी :** कर्जमाफी हा काही वेळचा दिलासा असू शकतो; पण तो कायमस्वरूपी उपाय नाही. शेतकऱ्याला अशी व्यवस्था हवी की त्याच्या उत्पादनाला योग्य भाव मिळेल, शेतीचा खर्च नियंत्रित राहील, नैसर्गिक आपत्ती आली तर विमा आणि नुकसानभरपाई तातडीने मिळेल आणि शेतीतून कुटुंबाचा सन्मानाने उदरनिर्वाह होईल. शेतमाल प्रक्रिया उद्योग गावाजवळ निर्माण झाले पाहिजेत. साठवणूक व्यवस्था वाढली पाहिजे. शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांना बळ मिळाले पाहिजे. शेतकऱ्याला केवळ कच्चा माल विकणारा नव्हे, तर मूल्यवर्धित उत्पादनातून अधिक उत्पन्न मिळविणारा उद्योजक बनविले पाहिजे. आता प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारण्याची वेळ राजकारणी म्हणू शकत नाही की हा फक्त कृषी विभागाचा प्रश्न आहे. अधिकारी म्हणू शकत नाहीत की आम्ही फक्त नियम पाळतो. नोकरदार वर्ग म्हणू शकत नाही.की हा आमचा विषय नाही. व्यापारी वर्ग म्हणू शकत नाही की बाजारभाव आमच्या हातात नाही. समाजही हात झटकून मोकळा होऊ शकत नाही. शेतकरी जगला तर बाजार जगेल, उद्योग जगतील, शहरे जगतील आणि महाराष्ट्र जगेल. म्हणूनच सरकारने शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केवळ समित्या आणि घोषणा न करता कालबद्ध कृती आराखडा तयार करावा. प्रत्येक जिल्ह्यात शेतकरी संकटाचे नियमित मूल्यमापन झाले पाहिजे. लोकप्रतिनिधींनी त्याचा आढावा घ्यावा, अधिकाऱ्यांनी अंमलबजावणी करावी आणि जनतेने त्याचा हिशेब मागावा. महाराष्ट्राच्या विकासाची खरी कसोटी गगनचुंबी इमारतींमध्ये नाही; ती शेतकऱ्याच्या घरातील चुलीत, त्याच्या मुलांच्या शिक्षणात आणि त्याच्या चेहऱ्यावरच्या समाधानात आहे. आज गरज आहे एका सामूहिक संकल्पाची, **"शेतकरी वाचवायचा नाही; शेतकऱ्याला इतका सक्षम करायचा की त्याला जगण्यासाठी कोणाकडे हात पसरावा लागू नये."** शेतकरी हा दयेचा विषय नाही. तो महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याचा सन्मान, सुरक्षितता आणि समृद्धी ही पूर्णपणे समाजाची जबाबदारी आहे.●●

## जातीय भेदभाव संपला नाही

### मग क्रिमीलेअर कशासाठी?

**नुकतेच केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आणि सांगितले की क्रिमिलेयर हे संविधानात नाही आणि सरकार क्रिमिलेयर लावणार नाही म्हणून हा लेखन प्रपंच.**




पंजाब राज्य विरुद्ध देवेंद्र सिंह' (2024) प्रकरणात 1ऑगस्ट 2024 रोजी सर्वोच्च न्यायालयात जो अनुसूचित जाती च्या वर्गीकरणाचा निकाल लागला त्याच निकालात मुद्दा नसताना अनुसूचित जाती जमाती यांना क्रिमिलेयर लावण्याबाबत विद्वान न्यायमूर्तींनी मत व्यक्त केले. तो आणि इतर निर्णयाचा आधार घेऊन अनुसूचित जाती जमाती यांना क्रिमिलेयर लागू करण्यात यावे या साठी सर्वोच्च न्यायालयाचे एक वकील यांनी प्रकरणात एक प्रमुख जनहित याचिका दाखल केली आहे. तसेच रमाशंकर प्रजापती आणि यमुना प्रसाद यांच्या वतीनेः उत्तर प्रदेशातील या याचिकाकर्त्यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयातील वकील हरी शंकर आणि सुनील कुमार सिंग हे न्यायालयात बाजू मांडत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाच्या ज्या खंडपीठासमोर सुरू आहे, त्याचे नेतृत्व खालील मुख्य न्यायमूर्ती करत आहेत न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्य बागची. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या आरक्षणाच्या संदर्भात सध्या देशात अत्यंत महत्त्वाची घटनात्मक चर्चा सुरू आहे. उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअर या दोन विषयांनी अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणाच्या भवितव्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात नुकत्याच दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या आरक्षणाला क्रिमीलेअरची संकल्पना लागू करण्यास विरोध केला आहे. केंद्र सरकारने आपल्या **भूमिकेच्या समर्थनार्थ पूर्वीच्या महत्त्वाच्या न्यायालयीन** निवाड्यांचा आधार घेतला आहे.

सुप्रीम कोर्टात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात केंद्र आपल्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी न्यायालयात प्रमुख न्यायालयीन निर्णयांचे संदर्भ दिले इंद्रा साहनी खटला केंद्र सरकारने स्पष्ट केले की, ऐतिहासिक इंद्रासाहनी निवाड्यात सामाजिकदृष्ट्या प्रगत व्यक्तींना (क्रिमीलेअर) आरक्षणातून वगळण्याची चर्चा केवळ इतर मागासवर्गीयांसाठी मर्यादित ठेवली होती. या संकल्पनेचा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीशी कोणताही संबंध जोडलेला नव्हता. अशोक कुमार ठाकूर विरुद्ध भारत सरकार या महत्त्वाच्या निर्णयाचा हवाला देत सरकारने नमूद केले की, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे की क्रिमी लेअरचे तत्त्व हे अनुसूचित जाती जमाती यांच्या आरक्षणाला लागू केले जाऊ शकत नाही. एम. नागराज प्रकरणात क्रीमिलेअर बाबत उल्लेख होता. या खटल्याबाबत याचिकाकर्त्यांनी दिलेल्या संदर्भावर उत्तर देताना केंद्राने स्पष्ट केले की, नागराज खटल्यात क्रिमी लेअरबाबत सर्वोच्च न्यायालयाने केलेली टिप्पणी ही केवळ एक 'सर्वसाधारण निरीक्षण' होती. तो अनुसूचित जाती जमाती प्रवर्गासाठीचा कोणताही विशिष्ट किंवा बंधनकारक अंतिम निर्णय नव्हता. ज्या याचिकाकर्त्यांनी अनुसूचित जाती जमाती मध्ये क्रिमी लेअर लागू करण्याची मागणी केली आहे, त्यांनी स्टेट ऑफ पंजाब विरुद्ध देवेंद्र सिंग (2024) या ७ न्यायाधीशांच्या घटनापीठाच्या निर्णयाचा आधार घेतला आहे. या १ ऑगस्ट २०२४ च्या निर्णयात न्यायालयाने राज्यांना उपवर्गीकरण करण्याची परवानगी दिली होती आणि काही न्यायमूर्तींनी वैयक्तिक मतात क्रिमी लेअर लागू करण्याचे समर्थन केले होते. मात्र, केंद्र सरकारने याचिका करणाऱ्यांचा हा युक्तिवाद फेटाळून लावला आहे. इंद्रा साहनी विरुद्ध भारत सरकार या १९९२ मधील नऊ न्यायमूर्तींच्या घटनापीठाच्या ऐतिहासिक निकालात क्रिमीलेअरची संकल्पना मुख्यतः इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाच्या संदर्भात लागू केली. त्या निर्णयात अनुसूचित जाती जमाती यांना क्रिमिलेयर लागू होणार नाही असे म्हटले आहे आणि ते नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाचे आहे. अनुसूचित जातींची घटनात्मक ओळख मात्र वेगळ्या ऐतिहासिक वास्तवाशी संबंधित आहे. अस्पृश्यता, जातीय बहिष्कार आणि सामाजिक भेदभाव ही त्यामागची मूलभूत पार्श्वभूमी आहे. म्हणूनच ओबीसींसाठी विकसित झालेली क्रिमीलेअरची संकल्पना तशीच अनुसूचित जाती-जमातींना लागू करता येईल का? हा मूलभूत घटनात्मक प्रश्न न्यायालया पुढे आहे. वास्तविक संविधानाच्या अनुच्छेद 340, 341, 342 आणि 16 (4) मध्ये उपवर्गीकरण आणि क्रिमिलियर याचा उल्लेख सुद्धा नाही. म्हणून ओबीसी साठी क्रिमी लेअर लावणे हे सुद्धा संविधान संगत आहे का हा प्रश्न पडतो?



**अनिल वैद्य**
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

**१ ऑगस्ट २०२४ :** देवेंद्रसिंगचा उपवर्गीकरणाचा ऐतिहासिक टर्निंग पॉईंट असा निर्णय आला. स्टेट ऑफ पंजाब विरुद्ध देवेंद्रसिंग या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाने १ ऑगस्ट २०२४ रोजी ६:१ बहुमताने अनुसूचित जातींच्या आरक्षणात राज्यांना उपवर्गीकरण करण्याचा घटनात्मक मार्ग खुला केला. या निर्णयामुळे ई. व्ही. चिन्नय्या या पूर्वीच्या पाच न्यायमूर्तींच्या निर्णयाची भूमिका उपवर्गीकरण विरोधी होती. मात्र येथे एक महत्त्वाची कायदेशीर बाब लक्षात घ्यावी लागेल. देवेंद्रसिंग प्रकरणातील मुख्य प्रश्न उपवर्गीकरणाचा होता. क्रिमीलेअरचा मुद्दा त्या प्रकरणातील मुख्य संदर्भित प्रश्न नव्हता तरी काही न्यायमूर्तींनी आपल्या स्वतंत्र मतांमध्ये अनुसूचित जाती-जमातींमध्ये क्रिमीलेअरचा विचार करण्याची भूमिका व्यक्त केली. परंतु त्या निरीक्षणांना उपवर्गीकरणाच्या मुख्य निर्णयाइतके स्वतंत्र बाध्यकारी आदेश समजणे कायदेशीरदृष्ट्या योग्य नाही.

त्याला कायद्याच्या भाषेत ओबीडरडिक्टा म्हणतात. पण या निर्णयातील निरीक्षण मुद्दा पुढे करून क्रिमी लेअर लागू करण्यासाठी याचिका दाखल केलेल्या आहेत. जातीय भेदभाव हा केवळ आर्थिक प्रश्न नाही. अनुसूचित जातीतील एखाद्या व्यक्तीचे उत्पन्न वाढले, तो उच्च शिक्षित झाला किंवा त्याच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती सरकारी सेवेत आली, म्हणून समाजातील जातीय भेदभाव पूर्णपणे संपतो का? हा प्रश्न क्रिमी लेअर लागू करण्यासाठी याचिका दखल करणाऱ्यांनी आणि न्यायमूर्ती स्वतःला विचारला पाहिजे. अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा ऐतिहासिक पाया केवळ गरिबी नाही. अस्पृश्यता, जातीय बहिष्कार, सामाजिक अपमान, शैक्षणिक व सामाजिक वंचितता आणि प्रतिनिधित्वाचा अभाव या व्यापक सामाजिक वास्तवाशी त्याचा संबंध आहे. आज एखादा अनुसूचित जातीतील विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातून आला असला, तरी त्याला जातीय ओळख लपवून जगता येत नाही. प्रवेश, रोजगार, सामाजिक संबंध आणि सार्वजनिक जीवनातील अनेक पातळ्यांवर जातीय पूर्वग्रहांचा अनुभव येत असल्याच्या घटना समाजासमोर येत असतात.म्हणूनच "उत्पन्न वाढले म्हणजे जातीय भेदभाव संपला" असा सरळ निष्कर्ष काढणे सामाजिक वास्तवाकडे दुर्लक्ष करणारे आहे. क्रमशः ■■

## ताईचा मळा

**वर्धा जिल्ह्यातील 'पुलगाव'च्या प्रसिद्ध लष्करी शस्त्रागार डेपोला सेंट्रल अम्युनिशन डेपो ( CAD ) असे म्हटले जाते. १९४२ मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी या दारुगोळा भांडारची ब्रिटिश सरकारने स्थापन केली.**

CAD डेपो, मध्य रेल्वेचे स्टेशन, तत्कालीन कापड मिल्स (स्थापना १८८९) यामुळे पुलगाव शहराचा चौफेर विस्तार झाला. २५ एप्रिल १९५४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पुलगावाला भव्य सभा झाली असल्याचा इतिहास आहे. यावेळी बाबासाहेबांच्या हस्ते बुदध विहाराचा कोणशीला समारंभ संपन्न झाला. बाबासाहेबांच्या या ऐतिहासिक भेटीमूळे या शहराच्या लौकिकतेत विशेष भर पडली आहे.

वर्धा नदीच्या काठावर वसलेल्या पुलगावच्या दक्षिणेस नाचणगाव नावाचे खेडे आहे. नाचणगाव पासून ४ कि.मी. अंतरावर 'ताईचा मळा' हे कौटुंबिक सहलीसाठी एक उत्तम कृषी पर्यटन स्थळ आहे. येथे सकाळी अल्पोपहार, चहा, दुपारी महाराष्ट्रीयन शाकाहारी भोजन दिले जाते. तर सायंकाळी बांबू गार्डन मध्ये कच्चा चिवडा आणि चहा दिला जातो. मळ्याच्या गेटवर आणि तारेच्या कुंपणावर रंगीबेरंगी बोगन वेल मनमोहक वाटते. येथील विविध फळबाग, रंगीबेरंगी फुलझाडे, विविध प्रकारचे पाळीव प्राणी, म्युझिक सिस्टम, स्वीमिंग पूल, हॉर्स राईडिंग, रोप वे, झिप लाईन, कमांडो नेट आणि बर्मा ब्रिज सर्वकाही मनोरंजनात भर घालणारे आहे. ताईच्या मळ्यात डीजे च्या ठेक्यावर रेन डान्स करणारे पर्यटक दिसतात. बैलगाडी आणि टांगा सवारी, ट्रेन्पोलिन, मिकी हाउस, खेळण्याची ट्रेन राईड करताना बदकांचे कळप, गाई-बकऱ्या, बैल, घोडे ई. चे सानिध्य जवळून पाहायला मिळते. मळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे येथे मुक्कामी राहण्याची सोय आहे. जंगलात असणाऱ्या टेंट आणि आधुनिक सुविधायुक्त स्वतंत्र घरांची व्यवस्था आहे. दिवसा पक्षांचा किलबिलाट आणि रात्रीची लाईटिंग आणि निरव शांतता वेगळा अनुभव देते. अनेक शाळेतील शैक्षणिक सहली आणि महिलांचे ग्रुप दिवसभरासाठी सतत सहलीला येतात. त्यामुळे ताईच्या मळ्यात नेहमी वर्दळ दिसून येते. मानवी जीवनात 'आई' चे स्थान अनन्यसाधारण आहे. प्रत्येक अपत्याची प्रथम गुरु, प्रथम मार्गदर्शक आईच असते. प्रत्येकाच्या कौटुंबिक जीवनात आई नंतर 'ताई' या शब्दाला मानाचे स्थान असते. आपली मोठी बहिण ही आपुलकीची आणि आदरभाव जोपासणारी 'ताई' असते. अर्थात कुटुंबात जन्मलेल्या मोठ्या बहिणीला 'बाई' किंवा ताई संबोधले जाते. 'बाई'ची जागा 'ताई' ने कधी घेतली ते कळले नाही. आमच्या कुटुंबात भावंडात सर्व प्रथम जन्मलेली 'ताई' ही मोठी बहीण होती. थोरली असल्यामुळे आमच्या कुटुंबातच नव्हे तर संपूर्ण गावात, नातेवाईकांत तिचे नाव 'ताई' असे प्रचलित झाले. 'ताई' दिसायला अत्यंत सुंदर, सुशील आणि तितकीच स्वभावाने प्रेमळ, नाते गोते जोपासणारी होती. सर्वांचे आदरतिथ्य व्हावे, घरी येणारा प्रत्येक व्यक्ती जेवण घेतल्याशिवाय जाऊ नये हा तिचा नियम. अठरा विश्व दारिद्र्यातही ताईने कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून अनेक नातेवाईकांच्या मुलांना शिक्षणात मदत केली. त्यामुळे ताई ही नातेवाईकांच्या गळ्यातील ताईत बनली होती. लग्नानंतर 'ताई चे गाव पुलगाव झाले. ताईला तीन मुले आणि एक मुलगी ! त्यापैकी एक सेवानिवृत्त अधिकारी आणि दुसरा मुलगा प्रमोद मकेश्वर उच्चपदस्थ सेवेत आहे. त्यांनी आपल्या आईच्या स्मृती प्रीत्यर्थ ताईचा मळ्याची निर्मिती केली. १० ऑगस्ट २०२१ रोजी ताईचे वृद्धावस्थेमुळे निधन झाले. आज ताई नाही, परंतु तिची सून मधुमिता मकेश्वर ताईचा वारसा पुढे नेत ताईचा मळा सांभाळत आहे. आज ताईचा पाचवा स्मृतीदिन ! ताईस विनम्र अभिवादन !!●●






**श्रीराम बनसोड,**
**8208617748**

## ध्येयवेडे व्यक्तिमत्त्व
## डॉ. सदाशिव चंद्रिकापुरे

**संघर्षाच्या आगीत तापून निघालेले सोने हाताशी काहीही नसताना स्वतःच्या कर्तृत्वाने सर्व काही उभे करणारा, परिस्थितीसमोर कधीही न झुकता सतत संघर्ष करून विजय मिळवणारा लढाऊ माणूस, स्वाभिमानी योद्धा आणि ध्येयवेडे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. सदाशिव चंद्रिकापुरे होय.**




कष्ट, जिद्द आणि संघर्षाच्या बळावर त्यांनी आपले जीवन सोन्यासारखे उजळून काढत समाजात स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण केले. डॉ. सदाशिव चंद्रिकापुरे आज वयाच्या ८८व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. हा क्षण त्यांच्या कुटुंबीयांसह मित्रपरिवारासाठी अभिमानाचा आहे. संघर्षातून मार्ग काढत आपल्या जीवनाला नवी दिशा देणारा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. डॉ. सदाशिवरावांचा जन्म १० ऑगस्ट १९३८ रोजी मसखापरा या गावातील एका छोट्याशा घरात झाला. बालपण अत्यंत गरिबीत आणि बिकट परिस्थितीत गेले. वडिलांचे छत्र लहानपणीच हरपल्याने कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या आईवर आली. अनेक अडचणी सहन करूनही त्यांच्या आईने मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले नाही. याच संस्कारांचा त्यांच्या पुढील जीवनावर मोठा प्रभाव पडला. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. परिस्थिती प्रतिकूल असतानाही त्यांनी शिक्षणाची कास सोडली नाही. शिक्षण, मेहनत आणि जिद्द यांच्या जोरावर त्यांनी आपल्या जीवनाची वाटचाल सुरू ठेवली. पुढे त्यांनी आयुर्वेदिक क्षेत्रात प्रवेश केला. सक्करदरा येथील आयुर्वेदिक रुग्णालयात कंपाउंडर म्हणून त्यांनी २१ वर्षे सेवा केली. नोकरी करत असतानाच त्यांनी आयुर्वेदाचे शिक्षण पूर्ण केले आणि पुढे डॉक्टर म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. अत्यंत साध्या परिस्थितीतून आलेल्या व्यक्तीने आपल्या कष्टाच्या बळावर वैद्यकीय क्षेत्रात मिळवलेले स्थान ही त्यांच्या संघर्षाची मोठी उपलब्धी आहे.१९८१ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांच्या कार्याला नवी दिशा मिळाली. मुंबई सेंट्रल येथे काही काळ काम केल्यानंतर त्यांची बदली नागपूर येथे झाली. पुढे दिल्ली, मुंबई आणि नागपूर अशा विविध ठिकाणी त्यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. मिळवलेले यश त्यांनी केवळ स्वतःपुरते मर्यादित ठेवले नाही. नोकरी आणि व्यवसायाच्या माध्यमातून त्यांनी आपले जीवन उभे केले. संघर्षातून नागपूरमध्ये त्यांनी भव्य आणि सुंदर 'राजगृह' उभे केले. त्यांच्या पत्नी सौ. डॉ. शालिनी चंद्रिकापुरे आणि कुटुंबीयांनीही त्यांच्या जीवनप्रवासात मोलाची साथ दिली.डॉ. चंद्रिकापुरे यांचे सामाजिक कार्यही उल्लेखनीय आहे. विविध पतसंस्था, कृती समित्या आणि गृहनिर्माण संस्थांच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. गरजू व्यक्तींना मदत करणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहकार्य करणे, छोट्या-मोठ्या उद्योगांना प्रोत्साहन देणे, विहार बांधण्यास मदत करणे, धम्मवर्ग घेणे, समता सैनिक दलाला सहकार्य करणे तसेच विविध सामाजिक उपक्रमांना हातभार लावणे, अशी अनेक कामे त्यांनी केली आहेत.त्यांच्या जीवनात अनेक चढ-उतार आले; मात्र त्यांनी कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही. अडचणी आल्या की त्यातून मार्ग काढत ते पुढे जात राहिले. म्हणूनच त्यांचा जीवनप्रवास 'संघर्षाच्या आगीत तापून निघालेले सोने' या उपमेला पूर्णपणे सार्थ ठरवतो. आज वयाच्या ८८व्या वर्षीही त्यांचा समाजसेवेचा प्रवास सुरू आहे. त्यांच्या जीवनातून तरुणांनी शिक्षणाचे महत्त्व, कष्ट, जिद्द, आत्मविश्वास, सातत्य आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी शिकावी. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी ध्येय निश्चित असेल आणि त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले, तर यश निश्चित मिळू शकते, हा संदेश डॉ. सदाशिव चंद्रिकापुरे यांच्या जीवनप्रवासातून मिळतो.त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास ही केवळ वैयक्तिक यशाची कहाणी नाही, तर समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देणारा आदर्श प्रवास आहे. त्यांच्या कर्तृत्वाची आणि सेवाभावाची प्रेरणा अनेक तरुणांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल.●●



**ज्योत्स्ना बनसोड**
**8766942982**

## राजांनी ब्राह्मणांना दान देऊन श्रीमंत व शक्तीमान केले!





**नागेश चौधरी** ( बहुजन विचारवंत )
**9970873560**

**येथील बहुतेक सर्व राजांनी ब्राह्मणांनाच संपत्तीवान आणि समृद्ध केले आहे आणि आज देखील ब्राह्मणांनाच संपत्तीवान करण्यात येत आहे. संघाची संपत्ती एवढी होण्यात सरकारी मदत दान व लोकांनी दिलेले दान आहे.**

**महादान करणारे राजे**

बळीराजाने ब्राह्मणांना काहीच स्वतःहून दान दिले नव्हते. म्हणून कपटीपणा करून वामनाने दान मिळवले होते. आणि आर्य भटांची सत्ता स्थापन केली होती.

पुढे मात्र खूप राजे दानकर्ते झाले.

**१. रामायण** रामायणात दशरथ राजा हा ब्राम्हण पूजक तसेच ब्राह्मणांना प्रचंड दान करणारा दाखवले आहे.

त्याने वित्त तसेच रत्नं व हजारो गाई दान केल्या. (बालकांड १८वा सर्ग)

रामाने रावणावर विजय मिळवल्या नंतर ब्राह्मणांना विविध प्रकारचे रत्न वस्त्र आणि एक लाख दुधारू गायी तेवढेच घोडे आणि शंभर सांड दिले.

इदं राज्यं च सकल जिवितं च हृदि स्थितम्।
सर्व मेतद् द्विजार्थ में सत्यमेतद् द्रविमी वः।।
(उत्तर कांड)

अर्थात, माझे राज्य, माझे संपूर्ण जीवन व सारे वैभव ब्राह्मण सेवेसाठी आहे.

यावरुन राजा कसा असावा हे रामायण सांगते.

राममंदिर त्याची आठवण देण्यासाठी?

**२. युधिष्ठिर - _महाभारत_**

राजसूय आणि अश्वमेध यज्ञांनंतर, ब्राह्मणांना हजार कोटी सोन्याचे दान केले.

**३. राजा शिवी - महाभारत / पुराणे_**

यज्ञांमध्ये संपत्ती दान करण्यासाठी प्रसिद्ध. त्यांच्या उदारतेचे वर्णन करण्यासाठी 'हजार कोटी सोन्याचे निष्क' हा शब्दप्रयोग वापरला गेला.

**४. राजाराज प्रथम चोल-** १०वे-११वे शतक

मंदिरांना ४८,४०० _कलंजू_ वजनाच्या १५५ चांदीच्या वस्तू दान केल्या. त्यांच्याकडे चांदीपेक्षा सोने आणि मौल्यवान खडे जास्त होते. मंदिरांना संपत्ती वितरणाचे केंद्र बनवले.

**५. कृष्णदेवराय** - विजयनगर साम्राज्य, १६ वे शतक

'तुला-पुरुष' आणि 'हिरण्य-गर्भ' विधी पार पाडले. तिरुपती, हंपी येथील मंदिरांना गावे, सोने आणि रत्ने दान केली.

**६. चालुक्य आणि राष्ट्रकूट**

सूर्यग्रहणाच्या वेळी 'षोडश महादान' केल्याची नोंद शिलालेखांमध्ये आहे. सोन्याच्या गायी, हत्ती आणि जमीन दान केली.




**शिवाजी महाराज** - १६७४

राज्याभिषेका वेळी जे'तुला-दान केले ते त्यांच्या वजनाच्या आठ प्रकारचे होते': त्यात ७ धातू + मसाले + कापड यांचा समावेश होता. त्याच प्रमाणे ब्राह्मणांना महिनाभर यथेच्छ भ 'लाख शंभर अधिक' वाटले. गागा भट्टाला एकट्याला ७,००० हून मिळाले.

_तुला दान + ब्राम्हण भोजन+ दक्षिणा हा एक प्रचंड ब्राह्मणांवर दान रुपात केलेला राजकीय-धार्मिक खर्च होता.

आजच्या हिशोबाने त्याची किंमत किमान २००-३०० कोटी, ते १००० कोटींहून अधिक व्हावी.

याचा अर्थ भारतातील बहुतेक राजांनी ब्राह्मणांना धनवान केलं आणि त्यांची शक्ती सामर्थ्य वाढवण्यासाठी साह्य केले. स्वातंत्र्या नंतर ब्राह्मणांची शक्ती कमी होण्या ऐवजी वाढत गेली आणि म्हणून आज ते सर्व क्षेत्रात सत्ताधारी झाले.

आज लोकशाही आहे असं म्हणतो परंतु जे मनुवादी आहेत, मनुस्मृतीला संविधान समजतात आणि आजचे सरकार संघाची म्हणजे ब्राह्मणी भूमिका राबवत आहे तर राजांनी जे केले त्याचीच पुनरावृत्ती सुरू आहे असे वाटते.

या भूमिकेचा विरोध करणारी नीती आणि नेते बुद्धा पासून फुले पेरियार शाहू आंबेडकर किंवा आज ते विचार पुढे नेणारे पराभूत अवस्थेत आहेत.●●

## इतनी शक्ति हमे देना दाता, मन का विश्वास कमजोर हो ना

हम चल नेक रस्ते पे हम से भुलकर भी कोई भूल होना. आमच्या मनाला एवढी शक्ती सकारात्मक शक्ती मिळो की, आमचे हातून चांगले काम, सत्याचे काम, मानवी मनाच्या अत्युच्च विचारसरणी चे काम करायला निसर्गाकडून तसेच स्वतःच्या अंतर्मनातून, कारुण्यमय हृदयातून मानवी हिताचे कामे करायची खूप सकारात्मक शक्ती मिळो. हे काम करताना बाहेरचा कोणीही ईश्वर गॉड अल्ला भगवान देव आपल्याला सहकार्य करणार नाही. तर आपले कारुण्यमय हृदय आपले सकारात्मक मन याला एवढे प्रगल्भ बनवायचे की आपण कधीही मागे पडता कामा नये.आपल्या महापुरुषांचे विचार त्यांची प्रेरणा त्यांची काम करण्याची अतुलनीय शक्ती, गती, युक्ती आपल्याला नेहमी मार्गदर्शक ठरेल.उदाहरणार्थ आपण हजार बाराशे किलोमीटरवरून अतिशय थकून आलो असलो व घरी जाऊन आराम करायचे ठरविले पण मात्र घराजवळ येताच कुणीतरी सांगितले की, 5ते10सेकंदापूर्वी आपल्या घराला आग लागलेली आहे. तेव्हा मात्र आपण सर्व शक्ती एकवटून आपल्या घराची आग विझविण्यासाठी इतरांना मदत मागू फोन लावू व आपल्या घराची आग विझविण्यासाठी प्रयत्न करू आळस झोप कुठे पळाली हे कळणारही नाही. त्याचप्रमाणे एवढी शक्ती आपल्यामध्ये कुठून आली हे कळतही नसते पण मात्र अफाट शक्ती मानवामध्ये असते तिचा पुरेपूर उपयोग करावा लागतो. आपल्या महापुरुषांनी त्यांच्यातील अफाट शक्तीचा उपयोग करून समाज घडविण्याकरता प्रयत्न केले तसाच प्रयत्न आपणही करू शकतो. तशी शपथ आपण आपल्या मनाला वेळोवेळी देऊ शकतो नुसते मनाला सूचना देऊन चालणार नाही तर मात्र प्रत्यक्ष कार्य सुरुवातही करावी लागणार आहे. कारण आपल्या मागे आपला समाज आपला देश आहे. या समाजाला या देशाला एका मानवतावादी विचारसरणीकडे नेण्याकरता आपणा सर्वांना खूप खूप झटून कार्य करावे लागेल. त्यासाठी कितीही अडथळे झाले कितीही विरोधक आले तरीही न घाबरता आपल्याला कार्य करावे लागेल. कोणतीही चूक भूल होऊ न देता,व झाली तरी न घाबरता महापुरुषांच्या प्रेरणा आपल्या सदैव पाठीशी असावे लागेल..●●

**मंगलवाटा**



**सम्राट माटे (मंगलदर्शी)**
**मो.9075113644**

# महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक न्याय विभागातील खाजगीकरण बंद करा ..

**सामाजिक न्याय विभागाच्या barti मध्ये कर्मचारी भरती पासून सर्वच कामात खाजगीकरण झाले आहे. खाजगीकरण म्हटले की सामाजिक समानता व न्यायाचा अभाव असतो, मनमानी असते, तिजोरीची लूट, आर्थिक गैरव्यवहार व त्यातून भ्रष्टाचारास वाव असतो.**




सामाजिक न्याय विभागाचे सर्वच वसतिगृह, निवासी शाळा, इत्यादीमध्ये जेवणाची व्यवस्थासाठी सेंट्रल किचनचे नावाने खाजगीकरण झाले आणि एका विद्यार्थ्यामागे प्रति महिना रुपये 2000/ - दोन हजार खर्च वाढला.

सामाजिक न्याय विभागात कार्यालय स्वच्छता, साफसफाई व सुरक्षा व्यवस्था, तसेच वसतिगृह व निवासी शाळेत हीच व्यवस्था लागू केली आहे. हे ठेके कोणाला दिले आहेत? कुठे चालला सामाजिक न्याय विभागाचा, SCSP चा कोट्यावधीचा निधी? खाजगीकरण मुळे नियमित पद भरती थांबली आणि आरक्षण गेले. अनुसूचित जातीच्या व्यक्ती व संस्थांची संधी गेली हे संविधान विरोधी आहे.

खाजगीकरणची व्यवस्था शोषण करते आणि सामाजिक न्याय नाकारते. विद्यमान सरकारचे काळात हे सुरू झाले, खर्च वाढला आणि कामाची गुणवत्ता जेमतेम आहे. विद्यार्थ्यांची ओरड सुरूच आहे, अधिकारी चूप आहेत, खाजगीकरण बंद करा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रयत्नाची उपलब्धी म्हणजे समाज कल्याण/सामाजिक न्याय विभाग. येथेच डॉ. बाबासाहेब यांचे विचारानुसार काम होत नसेल तर दोष कुणाचा? डॉ. बाबासाहेब यांचे नावाचा जयघोष करण्यासाठी, संविधान आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम केले गेले व केले जातात. यातही आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचाराच्या तक्रारी आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेणाऱ्यांनी व्यवस्था परिवर्तनाकडे विशेष लक्ष द्यावे. Gez - Z सोबतच Gen -Baby Boomers यांचे म्हणणे एकूण घ्यावे. संवेदनशीलता व संवाद झाला नाही तर सामाजिक न्याय होणार नाही.

**माझे मत**



**ई. झेड. खोब्रागडे**
**9923756900**

आम्ही संविधान फाऊंडेशन नागपूरचे वतीने सरकारला/विभागाला सातत्याने सांगत आहोत. प्रतिसाद मिळत नाही. आता, युवा पिढी प्रश्न विचारायला लागली, उत्तरे द्यावी लागतील. सरकारने स्वतः पुढाकार घ्यावा. व्यवस्था परिवर्तनासाठी हे पाऊल सरकारने उचलावे असे पुन्हा सुचवावेसे वाटते. सरकार काहीच हालचाली करीत नसेल तर युवापिढी Gen -Z, Gen -Alpha आणि Gen -Baby Boomers सरकारविरुद्ध संविधानिक हक्कासाठी नाईलाजाने आंदोलन करतील. ही वेळ येऊ न देणे सरकारच्या हातात आहे.●●

# बांबूपासून तयार होणारे साहित्य

बांबूपासून जे काही निरनिराळे साहित्य बनविले जाते. तो खरा व्यवसाय बुरड (करंडी) समाजाचा आहे आणि आजही ते जास्त नाही पण थोड्या प्रमाणात का होईना साहित्य बनवतात. त्यांचा उपयोग आमच्या ग्रामीण भागामध्ये दैनंदिन कामात सुद्धा केल्या जातो. व त्याचप्रमाणे नव्या बांबूपासून बनवलेल्या साहित्यांचा बऱ्याच शुभ कार्यासाठी किंवा लग्न समारंभासाठी असो, किंवा पोळ्याच्या दिवशी उपयोग केला जातो. त्याचप्रमाणे आमचा ग्रामीण भाग असल्यामुळे व शेतकरी वर्ग असल्यामुळे बाराही महिने त्यांचा उपयोग केला जातो त्यांना आमच्या झाडीबोली भाषेमध्ये कोणकोणत्या नावाने ओळखल्या जाते त्यांचे नाव येणेप्रमाणे!

**बांबू हे नाव कुणाच्याही परिचयाचे नाहीत असे होऊच शकत नाही. आमच्या झाडीबोली भाषेमध्ये बांबूला येरू, बास, करक या नावांनी सुद्धा ओळखल्या जाते. जंगलामध्ये किंवा कुणी आपल्या शेतावर बांबूची लागवड मोठ्या आवडीने करत असतात. दहा, बारा बांबूचा एकत्र समूह असते त्याला आमच्या झाडीबोली भाषेत 'रांजी' असे म्हणतात.**

तांदूळ, गहू, किंवा कोणतेही कडधान्य पाखडण्यासाठी (साफ) करण्यासाठी बांबूपासून तयार केलेल्या साहित्याला सूप असे म्हणतात, लग्न समारंभासाठी किंवा उन्हाळ्यामध्ये वळ्या, पापड टाकण्यासाठी उपयोग केला जातो त्याला पड्डा असे म्हणतात, डाळ कोणतीही असो धुवायची असल्यास तिला साटणी किंवा दारधुनी असे म्हणतात, तिच्यापेक्षा थोडी मोठी साहित्य असते तीला टोपली असे म्हणतात, पुन्हा त्याच टोपलीपेक्षा थोडी मोठी असते व आधीच्या काळातील महिला सणानिमित्त बनवलेले तेलाचे पदार्थ त्या साहित्यात खाली रद्दी वृत्तपत्र टाकून ठेवत असत. कारण खराब होऊ नये म्हणून व तेल पूर्णपणे सोसून घेते तिला बिवळी असे म्हणतात, तिच्यापेक्षा आकाराने मोठा साहित्य असते त्याला वळगा असे म्हणतात, त्यांच्यापेक्षा पुन्हा मोठ्या आकाराचे साहित्य असते त्याला हारा असे म्हणतात. त्या हाऱ्याचा उपयोग मिरची तोडणीच्या वेळी मिरची जमा करण्यासाठी केला जातो. आधीच्या काळात धान साठवून ठेवण्यासाठी प्लॉस्टिकचे कोणतेही साहित्य नसल्यामुळे



बांबूपासून तयार केलेले खूप मोठे साहित्य होते तिचे नाव ढोली होते त्याच ढोलीमध्ये धान साठवून वरतून धानाची तनस ठेवून शेणा,मातीने लिपून घेत असत. कारण वर्षभर ते धान जसेच्या तसे राहत होते. त्याचप्रमाणे ग्रामीण भागामध्ये गावरानी कोंबड्या जास्त प्रमाणात पोसल्या जातात त्यांना झाकण्यासाठी बांबूने तयार केलेल्या साहित्याला बेंडवा म्हणतात. ग्रामीण भागामध्ये रोजगार हमी योजना चालू असते. तेथे माती फेकण्यासाठी बांबूपासून तयार केलेल्या साहित्याला साबळा, किंवा झवा म्हणतात.

त्याचप्रमाणे दारधुनीपेक्षा थोडी मोठी साहित्य असते तिला चुरकी असे म्हणतात तिचा उपयोग मोहफुले किंवा मिरची तोडणीच्या वेळी केला जातो. तसेच ग्रामीण भागामध्ये घरोघरी गाई, म्हशी असतात त्यांचे शेण जमा करण्यासाठी बांबूपासून तयार केलेल्या साहित्याला शेनोडी म्हणतात, आधीच्या काळात मातीचे, कुडाचे घर होते घराच्या भोवताली वाल भिंती नव्हत्या त्यांना झाडीबोली भाषेत कसू म्हणतात. भिंत नसल्यामुळे घराचे संरक्षण व्हावे म्हणून बांबूपासून तयार केलेला साहित्य असायचा त्याला ठाटरा म्हणतात. पावसाळ्यात आधीच्या काळात जास्त प्रमाणात छत्र्या नसल्यामुळे बांबूपासून बनवलेली व तिला सोबत माऊरचे पाने किंवा पळसाचे पाने शिवून तयार केली असे तिला सातोळी म्हणतात, त्याचप्रमाणे पावसाळ्यामध्ये बांबूपासून तयार केलेल्या साहित्याला मोरा सुध्दा म्हणतात. धान रोवनीच्या वेळी महिला पांघरूण घेत असत. कारण तो गरम वाटत असे, पत्रावळी जोडण्यासाठी बांबूच्या बारीक अशा काड्या काढून घेत असत त्याला सिलका म्हणतात. असे अनेक साहित्य बांबूपासून तयार केलेले आधी बघायला मिळत असत. आजही दुर्गम भागात बघायला मिळत असते पण फार कमी प्रमाणात दिसून येतात भलेही हे सर्व साहित्य आता जास्त प्रमाणात दिसून येत नसतील तरी आजही लक्षात आहेत पण, जुने ते केव्हाही सोने असते हे खोटे नाही. त्यांच्यापासून आपल्याला कोणत्याही प्रकारची हानी होत नव्हती व बुरड समाजाला रोजगार सुद्धा मिळत होता. दोन पैसे ते साहित्य बनवून कमवत असत, पण आता जमाना बदलल्यामुळे त्यांची रोजी निघणे कठीण झाले आहे. प्लॉस्टिकचा वापर जास्त प्रमाणात होत असल्यामुळे माणसाच्या आरोग्यावर ती सुद्धा फरक जाणवतांना दिसत आहे. हे सुद्धा खरे आहे. असे काही जुने साहित्य दिसले की, मागे गेलेले सारे दिवस व ती परिस्थिती व काही आठवणी जाग्या होतात. आताचा जमाना बदलल्यामुळे काही दिवसात हे सर्व साहित्य बघायला सुद्धा मिळतील की नाही हे निश्चित सांगता येत नाही. पण आताच्या पिढीला या साऱ्या जुन्या साहित्याविषयी माहिती असणे गरजेचे असले पाहिजे. ●●



**संगीता संतोष ठलाल**
**7821816485**

# बेबस

**अनंतायन**



**ॲड. अनंत खेळकर**
**मो. 9370061677**

आयुष्यात एक काळ असा येतो की, कुणाबद्दल कोणतीही तक्रार करावी वाटत नाही. हा अनुभव बऱ्याच जणांना निवृत्तीनंतर जेव्हा ते वयोवृद्ध, होतात किंवा आजारी पडतात त्यांना नेहमी येतो. त्यांना जाणवते नात्यातील प्रेम हळूहळू ओसरत जाते. एकदिवस ते पूर्ण आटलेले असते. मग अशावेळी ही वयोवृद्ध व्यक्ती आपल्या मनाला हेच समजून सांगत असते की, सर्वांना समजून घेण्याचे वरदान जरी आपल्याला मिळालेले असले तरी पण आपल्याला कुणी समजून घेत नाही हा मिळालेला शाप आहे. 'जिन्हें समझा था जिंदगी, वो मरता छोड़ गए, मेरे अपनेही मुझे तन्हा छोड़ गए, अब जब जरूरत है, जिनके सहारे की, वो सब रास्ता मोड़ गए, मेरे अपने ही मुझे रोता देख, मुस्कुराते हैं, तो ग़ैरों से कहाँ उम्मीद रखूँ 'अशा हतबल अवस्थेत तो केवळ मरण येत नाही म्हणून जगत असतो. जग हे असचं आहे. प्रत्येकात काही ना काही तरी कमी ही असतेच असते पण ती कमी स्वतःची नाही तर इतरांची दिसते. ह्या कमतरतेची पडत्या काळात लोक पदोपदी जाणीव करून द्यायला विसरत नाहीत हे विशेष. कुणासाठी कितीही त्याग केला तरी तो कधी साथ सोडेल ह्याचा मुळीच नेम नसतो. 'जिंदगी कितनी भी ख़ूबसूरत क्यों ना हो, अपनों के बीना सूनी ही लगती है 'संसाराचा गाडा ओढतांना कितीतरी मनातल्या गोष्टींना मुरड घालावी लागते. 'कब्र सा सब्र है मेरा, न जाने कितनी इच्छाएँ दफ़्न हैं' ह्याची जाणीव अशा उपेक्षित व्यक्तीला वारंवार होत असते. त्याला आता मृत्यूची भीती वाटत नाही तर आपल्याला हवं तसं आयुष्य जगता येत नसल्याने होणारी घुसमट भितीदायक वाटते. 'उम्र ढली तो अपनों की नज़र भी ढल गई, कल तक जो थी क़द्र, आज वो बात कैसे बदल गई, बीमारी का भार उठाता है बेबस तन, और अपनों के व्यवहार का वार भी सहता है मन, दवा की शीशियाँ सिरहाने सजती रहती हैं, मगर अपनों की परछाइयाँ कम ही दिखती हैं,कल जिन हाथों ने घर की नींव संभाली, आज उन्हीं हॉथों में क्यों है खाली प्यार की झोली मत छोड़ो उन्हें अकेला उनकी मजबूरी पर, क्योंकि कल तुम्हारी कहानी भी लिखी जाएगी इसी दूरी पर'●●

# NEET च्या पलीकडे...

**सोनम वांगचुक यांचे २६ दिवसांचे उपोषण समाप्त झाले. Gen Z च्या आंदोलनाची धूळ खाली बसली. केंद्र सरकारने जलदगती न्यायालय स्थापन करण्याची आणि सार्वजनिक परीक्षांशी तडजोड करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदा आणण्याचे आश्वासन दिले. हे स्वागतार्ह पाऊल आहे. परंतु एखादी आग विझवणे म्हणजे संपूर्ण वणवा संपला असे समजण्याची चूक आपण करता कामा नये.**




वांगचुक आणि देशभरातील हजारो तरुण आंदोलकांनी उघड केलेला प्रश्न हा केवळ परीक्षा प्रक्रियेतील त्रुटींचा नाही; तो संपूर्ण शिक्षण व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या भ्रष्टाचाराचा आहे. प्रश्नपत्रिका फुटणे, संघटित नक्कलबाजी आणि पैशाच्या जोरावर गुणवत्ता विकत घेणारी व्यवस्था यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे परिश्रम एका रात्रीत व्यर्थ ठरतात. ही केवळ निष्काळजीपणा किंवा अकार्यक्षमता नसून, संघटित स्वरूपात चालणाऱ्या रॅकेटचे लक्षण आहे. अशा संकटावर समित्या, नियम किंवा तात्पुरते उपाय पुरेसे ठरत नाहीत, व्यवस्थात्मक बदल हाच एकमेव मार्ग आहे. या देशातील तरुण पिढी आता उत्तरांची अपेक्षा करत आहे. शिक्षण व्यवस्था मोडकळीस येण्यामागे भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप आणि स्वार्थी हितसंबंध हे प्रमुख घटक आहेत. अनेक तथाकथित शैक्षणिक संस्था सरकारी जमीन, अनुदाने आणि राजकीय प्रभाव टिकवण्याचे साधन बनल्या आहेत. दुसरीकडे विद्यार्थ्यांच्या असुरक्षिततेवर उभे राहिलेले कोचिंग उद्योगही या व्यवस्थेचा भाग बनले आहेत. दर्जेदार सरकारी शिक्षण, प्रशिक्षित शिक्षक आणि स्वतंत्र विचाराला प्रोत्साहन देणारी शिक्षणपद्धती निर्माण झाली तर या संपूर्ण व्यवस्थेचे स्वरूप बदलू शकते. खरा बदल म्हणजे केवळ परीक्षा सुरक्षित करणे नव्हे, तर मुलांना विचार करायला, प्रश्न विचारायला आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करायला शिकवणे. अशी शिक्षणव्यवस्था निर्माण झाली तर नागरिक अधिक सजग होतील आणि सत्तेला जाब विचारू लागतील. मात्र, हा बदल अनेक दशकांपासून पुढे ढकलला जात आहे. कोणतेही सरकार असो, व्यवस्थेतील मूळ दोष दूर करण्याऐवजी तात्पुरत्या उपायांवर भर देण्यात आला. अलीकडील आंदोलनानेही हीच मर्यादा दाखवून दिली. परीक्षा प्रक्रियेतील सुधारणा आवश्यक असल्या तरी त्या शिक्षण व्यवस्थेच्या केवळ एका भागाशी संबंधित आहेत. अभ्यासक्रम, शिक्षक प्रशिक्षण, सरकारी शाळांची गुणवत्ता, शिक्षणावरील सार्वजनिक गुंतवणूक आणि शिक्षणातील विषमता या अधिक मूलभूत प्रश्नांवर व्यापक चर्चा झाली नाही. त्यामुळे सरकारलाही मर्यादित मागण्या मान्य करणे तुलनेने सोपे गेले. विकसित राष्ट्र घडवण्यासाठी केवळ पायाभूत सुविधा किंवा आर्थिक वाढ पुरेशी नसते. शिक्षित समाज, सन्मानजनक रोजगार आणि गुणवत्तापूर्ण सार्वजनिक शिक्षण ही त्याची खरी पायाभरणी असते. शिक्षणासाठीच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये सातत्याने घट होत असताना विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करणे कठीण आहे. आजही सरकारी आणि खाजगी शाळांमधील दरी इतकी मोठी आहे की अनेक मुलांचे भविष्य त्यांच्या क्षमतेवर नव्हे, तर जन्माच्या परिस्थितीवर ठरते. सरकारला खरोखरच सुशिक्षित, विचार करणारे आणि प्रश्न विचारणारे नागरिक हवे आहेत का, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक दशकांनंतरही सरकारी शाळांतील मूलभूत सुविधांवर चर्चा करावी लागते, हीच आपल्या राष्ट्रीय प्राधान्यक्रमांची वस्तुस्थिती सांगते.

**राजू पाटील**
**मो.9970119716**

एक सुवर्णसंधी - वाया घालवलेल्या देशातील तरुणांकडे, Gen Z कडे एक दुर्मिळ आणि ऐतिहासिक संधी होती. देशाचे लक्ष त्यांच्यावर होते. गती त्यांच्या बाजूने होती. नैतिक अधिकार त्यांच्याकडे होता. ते भारताच्या शिक्षण व्यवस्थेत संपूर्ण बदलाची मागणी करू शकले असते. अभ्यासक्रमापासून ते शिक्षक प्रशिक्षणापर्यंत, अर्थसंकल्पीय तरतुदींपासून ते खाजगी आणि सरकारी शाळांमधील विषमता नष्ट करण्यापर्यंत, ते मागणी करू शकले असते. ते इतिहास घडवू शकले असते. त्याऐवजी ते परीक्षा प्रक्रियेतील बदलावर समाधानी राहिले. सत्ताधारी सुरक्षित आहेत. व्यवस्था अबाधित आहे आणि गळक्या छताखाली बसणारी मुले प्रतिक्षा करत राहतील; अशा पिढीची, जी अधिक मागण्याचे धाडस दाखवेल.●●

# मोर्चा आणि आंदोलनं

'काक्रोच जनता पार्टी' सी जे पी ने एक अभुतपूर्व आंदोलन करुन सरकारला दाखवुन दिले आहे ते काक्रोच नसुन भावी पीढीचे शिलेदार आहेत. त्यांच्याकडे दुर्क्ष करुन चालणार नाही. पेपर लीक मुळे २२ विद्यार्थी नी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यांची वर्षभर केलेली मेहनत वाया गेली. मानसिक परिणाम झाला तो वेगळा. ह्या संपुर्ण आंदोलनाची ज्याने सुरुवात केली त्या अभिजित दिपकेला मानाचा क्रांतिकारी जयभीम, सॅल्युट. त्याने अमेरीकेतली नोकरी सोडून काक्रोच जनता पार्टी स्थापन केली. अत्यंत शांतपुर्ण वातावरणात कुठलेही शस्त्र न घेता आंदोलन चालविले. हाती होते फक्त संविधान. उलट आंदोलन चिरडले जावे म्हणून सरकारने लाठीमार, अश्रूधुर, पॅलट गन्स, नकली पोलीसांच्या हाती खीळे लावलेल्या काठ्या देण्यात आल्या. निशस्त्र विद्यार्थ्यांना वाटेल तसे झोडपण्यात आले. शेवटी आंदोलन अधिक चिघडू नये यासाठी सरकारने नमते घेऊन शिक्षण मंत्र्यांना राजीनामा द्यायला भाग पाडले. शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेतला तरी इथली शिक्षण व्यवस्था एकदम कशी काय सुधारणार? श्रीमंताची मुले विदेशात शिकतात, त्यांना ना आरक्षणाची गरज ना कोचींग क्लासची गरज, मरतो तो इथला बहुजन समाजण. आज दोन हजार शाळा बंद करण्यात आल्या आहेत. जो तो कानवेंटची जबर फी भरून पोरांना शिकवत असतो. राजकारण्याना मात्र फक्त आपली सीट आपला पक्ष सांभाळण्यात रस असतो. १९७१/७२ ची गोष्ट आहे. दलीत पॅंथरतर्फे आम्ही मोर्चा काढला होता. त्या मोर्चात आम्ही फक्त आठ जण होतो. मोरचा आनंद टॉकीज ते रामदास पेठ एंपलायमेंट एक्सचेंज कार्यालयावर घेऊन गेलो होतो.

**मोर्चा, आंदोलनं, संप करणे म्हणजे न्यायासाठी, हक्का साठी, मागण्यासाठी, सरकार चुकत असेल तर त्याना जाब विचारण्याचा संविधानिक अधिकार, संविधानाने भारतातल्या प्रत्येक नागरीकास दिला आहे हे लोकशाहीतले लोकशाहीला जीवंत ठेवण्याचे हत्यार होय. प्रत्येकाने सरकारला प्रश्न विचारले पाहिजेत या आधी मीडिया सरकारला प्रश्न विचारीत असे. आता मीडियाचा आवाज बंद करण्यात आलेला आहे तो सरकारने आपल्या दिशेने वळविला आहे.**



एक रिक्षा, एक लाउड स्पिकर आणि आम्ही. पाठीमागे दोन चार पोलिस. आमची डोकी भादरली असल्याने सगळ्या लोकांचे लक्ष आमच्याकडे जात होते.

मी उंटखान्यात असताना एका अनोळखीच्या लिडरने तुम्हाला नोकरी पाहिजे का असे विचारले, आम्ही हो म्हणालो. त्याने मोर्चात यायला सांगितले. मोर्चाचा मारेस कॉलेज टी.पाइंट वरुन धनवटे रंगमंदिरवर न्यायचा होता. ठरल्या प्रमाणे आम्ही तिथे जमा झालो. आम्हाला घोषणा मध्ये सुर मिळवायचा होता. मोर्चाचा कशाबद्दल काही माहिती नव्हते तर जोश कुठुन येणार. थोड्या वेळाने माझ्या लक्ष्यात आले की तिथे कॉंग्रेसच्या दोन गटात भांडण सुरू होते. त्यापैकी एका गटाला आपली शक्ती दाखवायची होती. शक्ती दाखविणाया गटात आम्ही सामील झाले होतो. त्या लिडर ने आमचा असा गैरफायदा घेतला. नंतर त्याने नोकरी बाबत विचारले देखील नाही. तेवा पासून आम्ही सतर्क झालो. मागण्या जर खरच जोरदार असतील किंवा ज्यांच्यावर अन्याय, अत्याचार झाला असेल तर माणूस पेटून उठल्या शिवाय राहणार नाही. डॉ.बाबासाहेबानी म्हटले आहे की गुलामांना गुलामगिरीची जाणीव करून द्या तो पेटून उठल्याशिवाय राहणार नाही. अशाच एका दलीत पॅंथरच्या मोर्चात माझा लहान भाऊ रवींद्र शिर्के वाहनांच्या धक्क्याने जखमी झाला, पोलीस केसनंतर त्याला घरी पाठवण्यात आले. पोलीस केस असल्याने ही बातमी मंत्र्यांलयात पोहोचली. संध्याकाळी मंत्र्यांलयाकडुन भावाच्या तब्येतीची विचारपूस करण्यात आली. संबंधीत वाहन चालकांवर कारवाई झाली. कोरटात केस चालली. वाहन चालकाला दंड सुनावण्यात आला. तो दंड मात्र वर्ष भराने मीळाला. दंडाची रक्कम होती १३५ रुपये. कोणत्याही सरकारचा हेतू आंदोलन कसे चिरडले जाईल इकडे जास्त असतो. त्यासाठी ते नाना तऱ्हेचे हतकंडे वापरतात. नकली पोलीस, गुंड मोर्चात पाठविणे, दगडफेक करणे जेणेकरून अफरातफरी माजेल. काही मोर्चे क्यांडल मार्च, कधी निषेध, तर कधी श्रद्धांजली पर असतात. जेव्हा जेव्हा सरकारी कार्यालयात आंदोलन, संप हडताल, झाले कधी मागण्या मंजूर झाल्या तर कधी युनियन द्वारे संप मागे घेण्यात आले. हां पगार मात्र जरुर कापला जातो. सरकारी कायदाच आहेना नो वर्क नो पे. आणि मग संपात भाग घेतल्याबद्दल पनीशमेंट एफ.आर.१७ वगेरे. आता देशात काक्रोच पार्टीच्या आंदोलनानंतर कशी व्यवस्था येइल हे येणारा काळच सांगेल. तेवा मुकाबला करण्यासाठी आपण नेहमी तयार असले पाहिजे.●●



**दिवाकर शिर्के**
**मो. 9923862843**

## वाचकांचे विचारपिठ

### सामाजिक कार्यकर्ता किंवा नागरिकाला, विद्यार्थ्यांना आंदोलन

मा. संपादक सामाजिक कार्यकर्ता किंवा नागरिकाला, विद्यार्थ्यांना आंदोलन करण्याचा सरकारला एखाद्या प्रश्नावर लोकशाही मार्गाने, प्रश्न विचारण्याचा अधिकार, हक्क आहे. तो संविधानिक रीतीने आंदोलन करीत असेल तर त्याचा आवाज दाबणे म्हणजे दडपशाही होय. त्याचा नेमका प्रश्न काय? आहे. ते समजून, उमजून घेणे आणि त्यावर योग्य तो तोडगा काढणे म्हणजे लोकांचे स्वातंत्र्य जपने होय. निवडून येणे म्हणजे जनतेच्या कल्यानाची जबाबदारी घेणे होय. ती जबाबदारी आपण कितपत योग्य रीतीने पार पाडतो यावर सरकारचे यश, अपयश अवलंबून असते. जर पार पाडले नाही तर सरकारची दडपशाही असल्याचे म्हटले जाते. असे स्पष्ट शब्दात निर्भीडपणे संपादकीय मध्ये लिहितात. विनायक जामगडे, प्राचार्य भाऊ वासनिक, इ झेड खोब्रागडे, प्रवीण बागडे, एम.आर इंगळे, अनिरुद्ध शेवाळे, विकास झाडे अशा अनेकांची दैनिक बहुजन सौरभ मध्ये महत्वपूर्ण लेख आहेत. तसा आजचा दैनिकच जास्तीत जास्त पेपरफुटी वर दिल्ली येथे आंदोलन होत असलेल्या संदर्भात आहे. फार छान. संपादक आणि लेखक यांना सन्मानपूर्वक जयभीम

-अविनाश टिपले

# जल, जंगल, जमीन आणि घटनात्मक न्यायाचा जागतिक प्रवास

**जागतिक आदिवासी दिन : हक्क, अस्मिता आणि निसर्गसंवर्धनाचा गौरव. मानवी संस्कृतीच्या इतिहासात आदिवासी समाज हा केवळ एक सामाजिक घटक नसून, तो पृथ्वीवरील प्राचीन ज्ञानपरंपरेचा वाहक आहे. जंगल, नद्या, पर्वत, जैवविविधता आणि पर्यावरणाशी समरस होऊन जगण्याची जीवनशैली आदिवासी समाजाने मानवजातीला दिली आहे.**

आधुनिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होत असताना जग पुन्हा आदिवासी समाजाच्या शाश्वत जीवनपद्धतीकडे आशेने पाहत आहे. संयुक्त राष्ट्र संघाने १९९४ मध्ये ९ ऑगस्ट हा दिवस 'International Day of the World's Indigenous Peoples' म्हणून घोषित केला. हा दिवस केवळ उत्सव नसून न्याय, समानता, मानवी हक्क, सांस्कृतिक अस्मिता आणि स्वनिर्णयाच्या अधिकाराचा जागतिक घोष आहे. भारतातील गोंड, भील, कोरकू, वारली, संथाळ, मुंडा, उरांव, नागा, खासी, गारो, मिझो अशा शेकडो जमाती भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या लोककला, लोकसाहित्य, नृत्य, संगीत, औषधी ज्ञान, पारंपरिक शेती आणि पर्यावरण संवर्धनाची विचारसरणी हा मानवजातीसाठी अमूल्य ठेवा आहे. औपनिवेशिक काळात जंगलांवरील नियंत्रण, जमीन अधिग्रहण, विस्थापन आणि नैसर्गिक संसाधनांपासून आदिवासींना दूर ठेवण्याच्या धोरणांमुळे मोठा अन्याय झाला.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या निर्मात्यांनी हा ऐतिहासिक अन्याय ओळखून सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर आदिवासी समाजाला विशेष घटनात्मक संरक्षण दिले. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४, १५(४), १६(४), १९(५), २१, ४६, २४४, २७५ आणि ३३८-अ या तरतुदी अनुसूचित जमातींच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण आहेत. पाचवी अनुसूची अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींच्या प्रशासनाचे संरक्षण करते, तर सहावी अनुसूची ईशान्य भारतातील आदिवासी स्वायत्ततेला घटनात्मक आधार देते. PESA Act, 1996 ने अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला स्थानिक स्वराज्याची महत्त्वपूर्ण शक्ती दिली. ग्रामसभेच्या सहभागाशिवाय जमीन अधिग्रहण किंवा विकास प्रकल्प राबविताना आदिवासींच्या अधिकारांचा विचार करणे आवश्यक ठरते. Forest Rights Act, 2006 ने पिढ्यानपिढ्या जंगलाशी जोडलेल्या आदिवासींच्या वैयक्तिक आणि सामुदायिक वनहक्कांना कायदेशीर मान्यता देऊन ऐतिहासिक अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला. भारतीय न्यायव्यवस्थेनेही आदिवासी हक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. Samatha v. State of Andhra Pradesh (1997) या प्रकरणात अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी जमिनींच्या संरक्षणावर सर्वोच्च न्यायालयाने भर दिला. Orissa Mining Corporation v. Ministry of Environment & Forest (2013) या नियमगिरी प्रकरणात ग्रामसभेच्या भूमिकेला महत्त्व देत लोकसहभागाला प्रतिष्ठा मिळवून दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावर United Nations Declaration on the Rights of Indigenous Peoples (UNDRIP), 2007 हा आदिवासी हक्कांचा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. त्यात स्वनिर्णयाचा अधिकार, संस्कृती, भाषा, पारंपरिक ज्ञान, धार्मिक स्वातंत्र्य, नैसर्गिक संसाधनांवरील हक्क आणि Free, Prior and Informed Consent (FPIC) या तत्त्वांना मान्यता देण्यात आली आहे. ILO Convention No.169 नेही आदिवासींच्या जमीन, रोजगार, शिक्षण आणि सांस्कृतिक अधिकारांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. जगातील विविध देशांनी आदिवासी हक्कांच्या संरक्षणासाठी वेगवेगळी पावले उचलली आहेत. न्यूझीलंडमध्ये माओरी समाजाला प्रतिनिधित्व मिळाले आहे. कॅनडामध्ये First Nations, Inuit आणि Mtis समाजाच्या स्वशासनाच्या अधिकारांना मान्यता आहे. बोलिव्हियाने स्वतःला बहुराष्ट्रीय राष्ट्र म्हणून घोषित केले आहे. नॉर्वे, स्वीडन आणि

**ॲड. डॉ. घपेश ढवळे**
**मो.8600044560**



फिनलंडमध्ये सामी समाजाच्या सांस्कृतिक आणि भाषिक हक्कांसाठी संसदांच्या माध्यमातून संरक्षण दिले जाते. आज जग हवामान बदल, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास आणि पर्यावरणीय संकटांचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत आदिवासी समाजाचे पारंपरिक ज्ञान अत्यंत महत्त्वाचे ठरते. जलसंधारण, जैवविविधतेचे संरक्षण, औषधी वनस्पतींचे ज्ञान, नैसर्गिक शेती आणि शाश्वत जीवनपद्धती या क्षेत्रांत आदिवासी समाज जगाला मार्गदर्शन करू शकतो. तथापि, अनेक आदिवासी समुदाय आजही विस्थापन, गरिबी, कुपोषण, शिक्षणाचा अभाव, आरोग्य सुविधांची कमतरता, बेरोजगारी, मानवी तस्करी, खाण प्रकल्प आणि जंगलावरील निर्बंध अशा समस्यांशी झुंजत आहेत. त्यामुळे विकासाची संकल्पना त्यांच्या सहभागातून, संमतीने आणि अस्मितेचा आदर राखूनच राबविली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या विचारात दुर्बल घटकांना विशेष संरक्षण देण्याचा मूलभूत दृष्टिकोन होता. लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा अधिकार नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची समान संधी होय. आदिवासी समाजासाठी करण्यात आलेल्या घटनात्मक तरतुदींमध्ये हाच सामाजिक न्यायाचा आत्मा दिसून येतो. आज जागतिक आदिवासी दिन साजरा करताना केवळ शुभेच्छा देणे पुरेसे नाही. त्यांच्या हक्कांचे संरक्षण, संस्कृतीचा सन्मान, ज्ञानपरंपरेचे जतन आणि विकास प्रक्रियेत समान सहभाग सुनिश्चित करणे ही शासन, समाज आणि प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. जल, जंगल, जमीन हे आदिवासी समाजासाठी केवळ संसाधने नसून त्यांचे जीवन, संस्कृती, अस्मिता आणि अस्तित्व आहेत. त्यामुळे या हक्कांचे संरक्षण म्हणजे पर्यावरण, लोकशाही आणि भारतीय राज्यघटनेच्या मूल्यांचे संरक्षण होय. आदिवासी संस्कृती ही संग्रहालयात जतन करण्याची वस्तू नसून वर्तमानात जगणारी आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची जिवंत परंपरा आहे. त्यांच्या लोककला, लोकभाषा, लोकपरंपरा आणि निसर्गनिष्ठ जीवनदृष्टी हा भारताच्या सांस्कृतिक वारशाचा अमूल्य भाग आहे. ९ ऑगस्ट हा केवळ स्मरणाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. विकासाच्या प्रत्येक आराखड्यात आणि निर्णयात आदिवासी समाजाचा सन्मान, सहभाग आणि विश्वास केंद्रस्थानी राहिला, तरच भारताचा विकास खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक ठरेल. ज्या समाजाने जंगलाचे रक्षण केले, निसर्गाला देव मानले, जैवविविधतेचे संवर्धन केले आणि हजारो वर्षे पृथ्वीशी सुसंवाद साधत जीवन जगले, त्या आदिवासी समाजाच्या अस्तित्वाचा, स्वाभिमानाचा आणि घटनात्मक अधिकारांचा गौरव करण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट - जागतिक आदिवासी दिन.●●

